३१ ए

# MAHARASHTRA ACT No. XXXIX OF 1983

## THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE (AMALGAMATION OF BOMBAY AND KONKAN DIVISIONS) ACT, 1983.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ६ ऑगस्ट १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIX OF 1983.

*AN ACT*

*to amalgamate Bombay Division and Konkan Division into a single division under the Maharashtra Land Revenue Code, 1966.*

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ९ ऑगस्ट १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

**सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९.**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ या अन्वये मुंबई विभाग व कोंकण विभाग यांचे एका विभागात एकत्रीकरण करण्यासाठी अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१. ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ या अन्वये मुंबई विभाग व कोंकण विभाग यांचे एका विभागात एकत्रीकरण करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (मुंबई व कोंकण विभाग यांचे एकत्रीकरण) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस अमलात येईल.

**मुंबई व कोंकण विभागांचे एकत्रीकरण.** २. ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९८१ यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, मुंबई विभाग व कोंकण विभाग यांचे एका विभागात एकत्रीकरण करण्यासाठी, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा ह्या दोन जिल्ह्यांचा मिळून बनलेला विद्यमान मुंबई विभाग हा स्वतंत्र विभाग असण्याचे बंद होईल आणि उक्त दोन जिल्ह्यांची क्षेत्रे विद्यमान कोंकण विभागाच्या क्षेत्रांमध्ये अंतर्भूत करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या प्रयोजनास्तव, कोंकण विभाग हा, उक्त तारखेपासून, मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे सहा जिल्हे मिळून बनलेला असेल.

१९६६ चा महा. ४१. १९८१ चा महा. ४७. १९६६ चा महा. ४१.

**व्यावृत्ति.** ३. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला मुंबई शहर किंवा, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याशी संबंधित असलेली, आयुक्त, मुंबई विभाग यांच्याकडे दाखल करण्यात आलेली व प्रलंबित असलेली, कोणतीही अपिले किंवा इतर कार्यवाही, आयुक्त, कोंकण विभाग किंवा यथास्थिती, या बाबतीत त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी यांच्याकडे चालू राहील व निकालात काढण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.